ऑयकॉस !

काय बरं ऑयकॉस म्हणजे?

खरं तर हा शब्द पहिल्यांदा ऐकल्यावर संपूर्ण अनोळखी वाटतो; पण आपण इकॉलॉजीतला 'एको' हा शब्द बऱ्याचदा वापरतो. हा शब्द ज्या मूळ ग्रीक शब्दापासून तयार झालेला आहे, तो शब्द आहे 'आयकॉस' OiKOS म्हणजे मूळ घर किंवा निवास म्हणजेच जमीन किंवा पृथ्वी.

पुण्याच्या मानसी करंदीकर आणि केतकी घाटे या तरुण मुलींनी एकत्र येऊन जे काम सुरू केलं आहे, त्या संस्थेचं नाव आहे 'ऑयकॉस.' ऑयकॉस सुरू करण्यामागे अनेक हेतू आहेत, त्यातला सर्वात महत्त्वाचा हेतू आहे nature conservation is everybody's business.

म्हणजे निसर्गाचं जतन करणं हे प्रत्येकाचं कर्तव्य आहे.

निसर्ग, पर्यावरण असे शब्द उच्चारले की बऱ्याच जणांना वाटतं की आपण आपल्या परीनं करतोच निसर्गाची जपणूक ! तर काहींना वाटतं, आपल्या या गोष्टींशी दूरदूर तक कसलाही संबंध नाही.

मानसी आणि केतकीला मात्र असं वाटतं की, आपलं पर्यावरण ढासळतंय, याची कल्पना अनेकांना आली आहे. त्या दृष्टीने अनेक प्रयत्न सुरू आहेत; परंतु हे प्रयत्न कमी पडताहेत. कदाचित नेमकं काय करायचं, याची खरी, योग्य अचूक माहितीच अनेकांना नाहीये. अशी माहिती पुरवण्याचं कामच या दोघी करतात.

म्हणजे समजा तुमच्याकडे छोटीशी जमीन आहे. या जमिनीवर काय करायचं, हे




तुम्हाला समजत नाहीये. जमिनीचा पोत, तिथलं हवामान, हवामानाचा रोपं, झाडांवर किंवा मातीवर होणारा परिणाम, याबद्दल काही एक माहिती नाहीये; पण तिथं काहीतरी पिकवावं, उगवावं असं तुम्हाला वाटत असेल तर या बाबतीत 'ऑयकॉस' मदत करू शकते. ही जमीन प्रत्यक्ष बघून तिथे कोणती रोपं लावावीत, कांय खतं द्यावीत, किती पाणी द्यावं, याची पूर्ण माहिती आणि मार्गदर्शन या दोघी करतात. मोठे जमीनमालक, लॅन्ड डेव्हलपर्स, फार्म हाऊसचे मालक, कॉर्पोरेट सेक्टर्स यांना त्यांची जमीन कशी सजावयाची, याचे सल्ले इथे मिळतात आणि जमीन सजवताना ती हिरवीगार होण्याबरोबरच दुर्मिळ वृक्ष लावून पर्यावरण कसं राखलं जाईल, हे देखील ते बघतात.

अशा पद्धतीने इकोलॉजिक लॅण्डस्केप प्लॅनिंग करताना मोठ्या जमिनी, नवी शहरवस्ती किंवा फार्महाऊस, इथली जमीन तपासणं हा यांच्या कामाचा पहिला टप्पा असतो. तिथली झाडं न तोडता जमिनीचा वापर कसा करता येईल, पावसाचं पाणी अडवून कसं वापरता येईल, दुर्मिळ झाडं कशी लावता येतील, याबरोबरच तिथले पशुपक्षी, कीटक, फुलपाखरं यांच्या वादीसाठी, सुरक्षिततेसाठी कसे आसरे निर्माण करता येतील, याची योजना करावी लागते.

हे काम करण्यासाठी नेहमी मोठ्या जागाच हव्यात, असं नाही. घराभोवती छोटंसं इको लॅण्डस्केपिंगही करता येतं. अनेकदा लॅण्डस्केपिंग करायचं



म्हटलं की परदेशी, फॅन्सी झाडं लावली जातात. ही झाडं सहज मिळतात खरी; पण ही झाडं non-native असल्यामुळे आपल्या पर्यावरणाला योग्य नसतात. ती फक्त हिरवाई निर्माण करतात; परंतु देशी झाडं पर्यावरणाला अनुकूल असतात. पशु पक्ष्यांना हवा तसा आसरा देतात. हे लक्षात घेऊन 'ऑयकॉस'ने स्थानिक झाडांची नर्सरी तयार केली आहे. यात १२५ जातींची रोपं मिळू शकतील.

हे असं 'हटके' काम निवडण्याआधी माणसीनं एनव्हायर्नमेंट सायन्समध्ये एम.एस.सी. केलं, केतकीनं बॉटनी घेऊन बी. एस्सी. केलं. 'नॅचरल रिसोर्स मॅनेजमेंट, रिस्टोरेशन ॲण्ड सस्टेनेबल डेव्हलपमेंट' हा डिप्लोमा दोघींनी केला. त्याचवेळेस त्यांच्या मनात 'ऑयकॉस'ची कल्पना आली.

## फॉरेस्ट फूडची स्पर्धा

लोकांना स्थानिक वृक्षांचं महत्त्व कळावं, पटावं यासाठी ऑयकॉसतर्फे वेगवेगळे प्रयत्न सुरू असतात. त्यातलाच एक म्हणजे एकदा त्यांनी 'फॉरेस्ट फूड' म्हणजे रानभाज्यांच्या पाककृतींची स्पर्धा घेतली होती. या स्पर्धेला गावागावातून चांगला प्रतिसाद आला. यामुळे अनेक दुर्लक्षित पण रुचकर भाज्यांचे औषधी गुणधर्म, त्यांची पौष्टिकता समोर आली.

पर्यावरणीय व्यावसायिक कामाबरोबरच सध्या ऑयकॉस 'सेव्ह अवर सह्याद्री'(SOS) या पुण्याजवळ मुळशी भागात सुरू असलेल्या चळवळीचं काम करते आहे. निसर्गावर केवळ माणसाचाच नाही, तर इतर जिवांचाही तेवढाच हक्क आहे. तो हक्क मान्य करून, राखूनच विकास घडवायला हवा. या गोष्टी समजून घ्यायला जीवशास्त्रज्ञच असायला हवं, असं नाही, तर जबाबदार, निसर्गावर प्रेम असलं तर तेही पुरेसं आहे, असं त्यांचं मत आहे आणि हे खरंच आहे. ढासळत्या पर्यावरणाची चिंता केवळ वर्तमानपत्रातून व्यक्त होणं आता पुरेसं नाही. त्यासाठी जागोजागी हिरवाईचे जिवंत प्रयोग व्हायला हवेत आणि तेही इथल्या मातीशी, इथल्या हवा-पाण्याशी सुसंगत असायला हवेत. तरच इथला निसर्गाचा समतोल टिकून राहील.

**वैशाली कार्लेकर**
(अंकुर माध्यम)
ankurmadhyam@yahoo.com
oikos : (०२०) २५४६६९५९
email : tes@tesindia.com
w.s : www.tesindia.com